**भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र**

**(दुपार)**

जा.क्र. ५२० / माहिती कक्ष / वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १९/०७/२०१७

**१) अल्पवयीन मुलीला फुस लावुन पळवुन नेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १५/०७/२०१७ चे १५.२३ वा. दर. यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १६ वर्ष, ही मैत्रिनीचे गावी पेंढरी पोहरा येथे जाते म्हणुन घरी सांगुन निघुन गेली परंतु घरी परत आली नाही तिचा मैत्रिनी कडे व नातेवाहीकात शोध घेतला असता मिळुन आली नाही मोबाईल वरुन फोन करुन माझा शोध घेवु नका मी गुजरात येथे गेली आहे मुलीने सांगितल्याने तिला कोणीतरी अज्ञात आरोपीने फुस लावुन पळवुन नेले असावे असे फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३६३ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोले पो.स्टे. पालांदुर हे करीत आहेत.

**२) तलावाचे पाण्यात बुडुन इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक १८/०७/२०१७ चे ०८.०० वा. ते १९/०७/२०१७ चे ०६.०० वा. दर. यातील मृतक विलास सोधीलाल सोनवाने वय ४० वर्ष, रा. चिचगाव गावाजवळील तलावामध्ये मासोळी पकडण्यास गेला असता तलावात मासोळी पकडत असतांना तलावाचे पाण्यात बुडुन मृत्यु पावल्याने फिर्यादी बाबुराव बकाराम चौधरी वय ५५ वर्ष, रा. चिचगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम १७४ प्रमाणे मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खंडाते पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**३) रस्सीने गळफास लावुन मुलीचा मृत्यु . :–**

दिनांक १९/०७/२०१७ चे १५.०० वा. दर. यातील मृतक कु. गौरी जिवन राहांगडाले वय १४ वर्ष, रा. सुकळी नकुल हिने घरी कोणीही हजर नसतांना स्वयंपाक खोलीतील मयालीला कोणत्यातरी अज्ञात कारणाने रस्सीने गळफास लावुन आत्महत्या केल्याने फिर्यादी चंद्रभोज कंजीलाल राहांगडाले वय ४८ वर्ष, रा. सुकळी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम १७४ प्रमाणे मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. कदम पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**४) किटकनाशक विषारी औषध प्राशन केल्याने इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक १७/०७/२०१७ चे २१.४५ वा. दर. यातील मृतक रमेश तेजराम चोळे वय ३५ वर्ष, रा. चांदमारा हा दिनांक १७/०७/२०१७ ला किटकनाशक विषारी औषध प्राशन केल्याने त्यास औषधोपचारा करीता सु. बो दवाखाना तुमसर येथे भरती केले असता उपचारादरम्यान दिनांक १७/०७/२०१७ चे २१.४५ वा. मरण पावल्याने पो.स्टे. तुमसर येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. इंगोले यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम १७४ प्रमाणे नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. लिल्हारे पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

**५) वाहन सार्वजनीक ठिकाणी आमरोडवर थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या लोकांच्या जिवीतास धोका निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १९/०७/२०१७ चे १६.३० वा. दरम्यान यातील आरोपी वाहन चालकाने आपल्या ताब्यातील टाटा सुमो गाडी क्र. सीएम २४९७ ही आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस तसेच लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत उभी करतांनी मिळुन आल्याने पोस्टे. पवनी येथे कलम २८३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोडवते पो.स्टे. पवनी हे करीत आहेत

**६) वाहन सार्वजनीक ठिकाणी आमरोडवर थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या लोकांच्या जिवीतास धोका निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक १९/०७/२०१७ चे १८.०० ते १८.३० वा. दरम्यान यातील आरोपी वाहन चालकाने आपल्या ताब्यातील एमएच ३६ एफ ३६१६ ही आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस तसेच लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत उभी करतांनी मिळुन आल्याने पोस्टे. भंडारा येथे कलम २८३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोडवते पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत

**७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :-**

दिनांक १८/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १५० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०४ तीन सिटर वाहनांवरती २५ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १२१ केसेस करण्यात आलेल्या आहेत

**पोउपनि. जे. एन. लाकडे**
**नियत्रंण कक्ष अधिकारी**
**भंडारा**
**दुरध्वनी.क्र.९४०३४३८५४६**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.